# उद्योग संचालनालय

नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई- ४०० ०३२
दुरध्वनी क्रमांक- ०२२-२२०२३५०५ फॅक्स क्रमांक ०२२-२२०२६८२६
Email –dicspo@maharashtra.gov.in

क्र.उसं/भांख/चौकशी/सायकल/जोंधळे (पाटील)/४५/२०१९ /क्र ७८१ दिनांक :- 15 OCT 2020

## काळया यादीत टाकण्याबाबत आदेश

**वाचा**:-१) शासन परिपत्रक क्र. एसपीओ-१०९७/३३९२६/सीआर-२८००/उद्योग-६ दि.१३.०८.१९९७
२) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२ भाग-३/उद्योग-४, दि.०१.१०.२०१६
३) उद्योग संचालनालयाचे दरकरार आदेश क्र.No.SPC/RCT/Bicycle/०६/२०१३-१४/B-३२७,दि.१३.०१.२०१४
४) उद्योग संचालनालयाचे पत्र क्र.उसं/भांख/एसपीसी/आरसीटी/बायसिकल/०६/२०१३-१४/२०१९/अे-४७६, दि.१६.०३.२०१९
५) शासनाचे पत्र क्र.कायास-२०१९/प्र.क्र.५२/उद्योग-४, दि.२१/०६/२०१९
६) उद्योग संचालनालयाचे क्र.SPC/RCT/Bicycle/०६/२०१३-१४/२०१९/बी-११८९५, दि.१७.०७.२०१९ रोजीचे पत्र
७) चौकशी अधिकारी यांचे चौकशी अहवाल क्र.उसं/भांख/ चौकशी/ सायकल/ जोंधळे (पाटील)/४५/२०१९/बी-१९२४८, दि.१६.११.२०१९
८)उद्योग संचालनालयाचे पत्र क्र. उसं/भांख/चौकशी/सायकल/जोंधळे (पाटील)/४५/२०१९/अे-४५, दि.१३.०१.२०२०
९) उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग शासन ज्ञापन क्र. कायास २०१९/प्र.क्र.५२/उद्योग-४, दि.२२.०७.२०२०

**प्रस्तावना**

सन २०१३-१४ या वर्षीचा सायकल या बाबीचे दरकरार मे.जोंधळे (पाटील) ॲण्ड कंपनी, ३ जमली मंजिल, विनोद इंजिनिअरींग मागे, वडाळा नाका, नाशिक-४२२ ००१ यांच्याशी दि.१३.०१.२०१४ रोजी बांधील करण्यात आलेले होते. विविध शासकीय कार्यालयाकडून तसेच शासनाकडून मे.जोंधळे (पाटील) ॲण्ड कंपनी, नाशिक या पुरवठादाराने सन २०१३-१४ या वर्षामध्ये सायकल या बाबीचा/मालाचा पुरवठा विहित कालावधीत केला नसल्याबाबत/पुरवठा केला नसल्याबाबत संचालनालयास तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने संचालनालयाच्या दि.०४.०२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये संबंधित कार्यालयास मालाचा पुरवठा का करण्यात आलेला नाही? याबाबत मे. जोंधळे (पाटील) ॲण्ड कंपनी, नाशिक यांचेकडून खुलासा मागविण्यात आलेला होता. सदरच्या पत्राच्या अनुषंगाने मे. जोंधळे (पाटील) ॲण्ड कंपनी यांच्याकडून दि.२६.०२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये खुलासा प्राप्त झाला.

सदर खुलाशाची प्रत संचालनालयाच्या दि.१८.०४.२०१५ रोजीच्या पत्रान्वये, संबंधित तक्रारदार कार्यालयास पाठवून दरकरारधारकास पुरवठा आदेश कधी पाठविले व ते त्यांना कधी प्राप्त झाले याबाबत पुरावा, पोच पावती, दरकरारधारकास पाठविण्यात आलेले स्मरणपत्रे व इतर पत्रव्यहार संचालनालयास सादर करण्याबाबत कळविले होते. त्याअनुषंगाने, १) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अहेरी जि.गडचिरोली २) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.), महिला व बालकल्याण विभाग, जि.प. वर्धा व ३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण जि.प. गोंदिया यांच्याकडून माहिती प्राप्त झाली.

अन्य कार्यालयाकडून माहिती प्राप्त झालेली नसल्याने, संचालनालच्या दि.०४.०१.२०१६ रोजीच्या पत्रान्वये, स्मरणपत्र-१ व दि. २९.०३.२०१६ रोजी स्मरणपत्र-२/अंतीम पत्र पाठविण्यात आली. त्याअनुषंगाने, १) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, समाज कल्याण विभाग, जि.प.ठाणे २) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क), जि.प.सोलापूर ३) महिला व बाल विकास अधिकारी, जि.प. ठाणे या कार्यालयाकडून माहिती प्राप्त झाली.

उपरोक्त कार्यालयांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने, संचालनालयाच्या दि.०५.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये, दरकरारधारकास स्मरणपत्र/अंतीम पत्र पाठवून याबाबतचा खुलासा सादर करण्याबाबत कळविले होते. त्याअनुंषंगाने दरकरारधारकाकडून दि.१८.०७.२०१७ रोजी खुलासा संचालनालयास प्राप्त झाला. सदर खुलाशाच्या अनुषंगाने ज्या कार्यालयाकडून माहिती प्राप्त झाली अशा कार्यालयाकडून संचालनालयाच्या दि.११.०६.२०१८ रोजीच्या पत्रान्वये, अभिप्राय मागविण्यात आले.

त्यानुसार,सदर निविदाधारकाचे नाव काळया यादीत टाकण्याबाबत कार्यवाहीच्या अनुषंगाने, चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकारी नेमणूकीबाबत संचालनालयाच्या दि.१६.०३.२०१९ रोजीच्या पत्रान्वये, शासनास प्रस्तावित करण्यात आले होते. त्यानुषंगाने शासनाने दि.२१.०६.२०१९ रोजीच्या पत्रान्वये, प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यासाठी संचालनालयाच्या स्तरावरुन आवश्यक ते आदेश निर्गमित करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार, पुढील कार्यवाही करण्याबाबत चौकशी करण्यासाठी संचालनालयाच्या दि.१७.०७.२०१९ रोजीच्या पत्रान्वये चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली.

त्याअनुषंगाने, चौकशी अधिकारी यांनी दि. १६.११.२०१९ रोजीच्या पत्रान्वये "मे.जोंधळे (पाटील) ॲण्ड कंपनी, नाशिक या दरकरारधारकाने दरकरारानुसार सायकलीचा पुरवठा न केल्यामुळे त्याबाबतचा "चौकशी अहवाल" भांडार खरेदी शाखेस सादर केला.

**<u>चौकशी अहवाल:-</u>**

बहुतांश तक्रारदार खरेदी कार्यालयाने/खरेदी विभागाने संचालनालयाच्या दरकरारातील अटी व शर्तीप्रमाणे अटी व शर्ती पुरवठा आदेशात नमुद न करता विसंगत अटी पुरवठा आदेशात नमुद करुन आदेश निर्गमित केलेल्या आहेत. तसेच काही कार्यालयाच्या बाबतीत पुरवठादाराने मालाचा पुरवठा न करता मालाची देयके आगाऊ सादर केल्याचे दिसून येते. त्यावरुन पुरवठादार दोषी असल्याचे दिसून येते.

सदर पुरवठादाराविरुध्द एकूण १७ कार्यालयाच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या १७ तक्रारीपैकी १४ तक्रारीमध्ये खरेदीदार कार्यालयाकडून दरकरारामधील अटी व शर्ती यामध्ये बदल करणे/भंग करणे (देयकाच्या अटी व शर्ती, पुरवठा कालावधी कमी करणे, पुरवठा स्विकृती वेळी पुनश्च तपासणी करणे इ.) याचा समावेश आहे. तथापि, १)

जिल्हा परिषद,वर्धा २) जिल्हा परिषद, गोंदिया ३) जिल्हा परिषद, यवतमाळ या तीन खरेदी कार्यालयाच्या तक्रारीमध्ये पुरवठादाराने वस्तूचा पुरवठा करण्यापूर्वी संबंधित कार्यालयास आगाऊ देयके सादर केल्याचे निदर्शनास येते, यामध्ये पुरवठादार दोषी असल्याचे स्पष्ट होते.

**आदेश-**

१) बहुतांश तक्रारदार खरेदी कार्यालयाने/खरेदी विभागाने संचालनालयाच्या दरकरारातील अटी व शर्तीप्रमाणे अटी व शर्ती पुरवठा आदेशात नमुद न करता विसंगत अटी पुरवठा आदेशात नमुद करुन आदेश निर्गमित केलेल्या आहेत. तसेच काही कार्यालयाच्या बाबतीत पुरवठादाराने मालाचा पुरवठा न करता मालाची देयके आगाऊ सादर केल्याचे दिसते. त्यावरुन पुरवठादार दोषी असल्याचे स्पष्ट होते.

२) उद्योग विभागाच्या दिनांक ०१.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यात सुधारित खरेदी धोरण लागू करण्यात आले असून, त्यामधील तरतुदीनुसार यापूर्वीची दरकरार पध्दती रद्द करण्यात आलेली आहे. उपरोक्त पुरवठादाराच्या तक्रारी हया सन २०१३-१४ मधील सायकल या बाबीच्या दरकराराशी निगडित होत्या. एकूण १७ कार्यालयाच्या तक्रारीमधील १४ तक्रारीमध्ये खरेदीदार कार्यालयाकडून दरकरारामधील अटी व शर्ती यामध्ये बदल करणे/भंग करणे (देयकाच्या अटी व शर्ती, पुरवठा कालावधी कमी करणे, पुरवठा स्विकृती वेळी पुनश्च तपासणी करणे इ.) याचा समावेश आहे. तथापि, ३ तक्रारीमध्ये पुरवठादाराने वस्तूचा पुरवठा करण्यापूर्वी संबंधित कार्यालयास आगाऊ देयके सादर केल्याचे निदर्शनास येते, यामध्ये पुरवठादार दोषी असल्याचे स्पष्ट होते. आणि

३) पुरवठादाराने वस्तुंचा पुरवठा न करता आगाऊ देयके सादर केल्याने पुरवठादारास १ वर्षाकरीता संबंधित ३ कार्यालये अनुक्रमे १) जिल्हा परिषद, वर्धा २) जिल्हा परिषद, गोंदिया ३) जिल्हा परिषद, यवतमाळ करीता काळया यादीत टाकण्यात येत आहे.

विकास आयुक्त (उद्योग)
उद्योग संचालनालय, मुंबई

**प्रत:-** १) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (सर्व)-----------------------------------------------
यांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व कार्यालये/महामंडळ यांना निदर्शनास आणण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

२) मे.जोंधळे (पाटील) अँड कंपनी, ६ जमली मंजील, वडाळा नाका, नाशिक

३) निवडनस्ती (उद्योग-४)